महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ◆१२ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०८० ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## केडीएमसीत चार सदस्यीय प्रभाग रचना

### अपक्ष दादा-भाईची मक्तेदारी संपुष्टात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : एक पक्ष, गटाचे नगरसेवक निवडून येतील अशा पध्दतीने कल्याण डोंबिवली पालिकेच्या १२२ प्रभागांची चार सदस्यीय प्रभाग रचनेप्रमाणे ३१ प्रभागांमध्ये रचना करण्यात आली आहे. एक पक्ष, एक गट आणि एका विचाराचे सदस्य या चार सदस्यीय प्रभाग रचनेत आपले स्थान टिकून ठेवणार आहेत. त्यामुळे यापूर्वी एकला चलो रेचा नारा देत प्रभागांमधून अपक्ष म्हणून निवडून येणारे आणि नंतर पालिकेतील सत्ता स्थापनेच्यावेळी आपले 'महत्व' वाढविणारे अपक्ष दादा-भाई यांची मक्तेदारी चार सदस्य प्रभाग रचनेत संपुष्टात येणार आहे, अशी माहिती राजकीय क्षेत्रातील एका जाणकाराने दिली.

आतापर्यंत कोणत्याही पक्षात सहभागी न होता अपक्ष म्हणून निवडून येऊन कल्याण डोंबिवली पालिकेतील सत्ता स्थापनेच्या वेळी काही अपक्ष नगरसेवक आपली गडगंज आर्थिक गणिते साध्य करून सत्ता स्थानी बसणाऱ्या पक्ष, युतीला पाठिंबा देत होते. पालिकेत ज्या वेळी बहुमताचा मतदानाचा विषय येत होते. त्यावेळीही या अपक्ष नगरसेवकांचा भाव वधारत होता. मागील पंचविस वर्षाच्या कालावधीत अशा अनेक अपक्षांनी यापूर्वी पालिकेत मौजमजा केली. असे मौजमजा करणारे अपक्ष आता मात्र चार सदस्य प्रभाग रचनेत बाद होण्याची चिन्हे आहेत.नोव्हेंबर २०२० मध्ये कल्याण डोंबिवली पालिकेतील लोकप्रतिनिधी राजवटीची मुदत संपली. दरम्यानच्या काळात करोना महासाथ सुरू होती. या कालावधीत पालिकेत नगरसेवक म्हणून निवडून येण्यासाठी अनेक नवख्या, उमद्या, हरहुन्नरी तरूणांनी करोना महासाथीच्या काळात घरोघरी किराणा, बटाटे, कांदे, भाजीपाला, मुखपट्टी असे अनेक उपक्रम राबवून आपले स्थान लोकांच्या हदयात निर्माण करण्याचा प्रयत्न केला. असे अनेक समाजसेवक तरूण आता प्रभागांमध्ये स्वसामर्थ्यावर काही पक्षीय आधार घेत दिखाव्याच्या लोकसेवेत व्यस्त आहेत. आपणास आपल्या लोकांमधील कामाच्या बळावर नक्कीच नगरसेवक म्हणून कल्याण डोंबिवली पालिकेत निवडून जाण्यासाठी ताकद मिळेल असे या होतकरू इच्छुक नगरसेवकांना वाटते.




नगरसेवक म्हणून निवडून येण्यासाठी सामाजिक कार्याबरोबर पैशांची बेगमी पण लागणार आहे. म्हणून अनेक होतकरू तरूणांनी बेकायदा चाळी, इमारतींच्या माध्यमातून कमाई करून ती पुंजी पालिका निवडणुकीसाठी सज्ज करून ठेवली आहे. यामधील बहुतांशी तरूण हे आपण नगरसेवक होणारच या विचारातून आतापासून कामाला लागले आहेत. या होतकरू इच्छुक भावी लोकप्रतिनिधींनी अधिक संख्येने डोंबिवली, कल्याण परिसरात, खाडी किनारी भागात अधिक संख्येने बेकायदा चाळींची उभारणी केली आहे. त्यामुळे या इच्छुक नगरसेवकांना शहरात 'चॉल्डर' (बेकायदा चाळी बांधणारा) म्हणूनही ओळखले जाते.

मागील २५ वर्षाच्या कालावधीत काही ठराविक प्रभागांमधून अपक्ष म्हणून निवडून येणारे यापूर्वीचे नगरसेवक वतनदारासारखे पालिकेत मिरवत होते. आता जुन्या माजी अपक्ष नगरसेवकांचीही चार सदस्य प्रभाग रचनेमुळे कोंडी झाली आहे. जुनेजाणते अपक्ष नगरसेवक, नगरसेवक होण्यासाठी इच्छुक असलेले नवखे दादा-भाई चार सदस्य प्रभाग रचनेत टिकाव लागणार नाही या विचारातून इतर पक्षांचे झेंडे हातात घेण्यासाठी सरसावत असल्याचे चित्र आहेत. यामध्ये जुन्या जाणत्या अपक्षांचीही भर आहे.

## सत्तावीस गावातील निवडणुकांना ग्रामस्थांचा विरोध

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या प्रारूप प्रभागरचनेवर हरकती व सूचना सादर करण्यासाठी गुरुवारी (ता. ११) पालिका मुख्यालयात सुनावणी झाली. या वेळी संघर्ष समितीने २७ गावांमध्ये निवडणूक घेऊ नये, अशी जोरदार मागणी केली. याला शिवसेना (उद्धव ठाकरे गट), काँग्रेस, मनसे आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांचा पाठिंबा मिळाला. या २७ गावांचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असून, १८ गावांना महापालिकेपासून वगळण्याचा शासन निर्णय (जीआर) २०२२ मध्येच काढण्यात आला आहे. त्यामुळे २७ गावांना समाविष्ट करून तयार करण्यात आलेली प्रभागरचना चुकीची आहे, असा युक्तिवाद संघर्ष समितीने केला.

हरकतींच्या सुनावणीवेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष व राष्ट्रवादी खासदार सुरेश म्हात्रे उपस्थित होते. त्यांनी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत या गावांमध्ये निवडणूक घेऊ नये, अशी मागणी लावून धरली. या प्रभागरचनेवर ३,६४२ हरकती दाखल झाल्या असून, या गावांमध्ये प्रभागरचना करणे कायद्याच्या विरोधात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पालिका प्रशासनाने या मागण्यांचा विचार करून पुढील निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

काँग्रेसचे प्रदेश प्रतिनिधी संतोष केणे यांनी सांगितले, की २७ गावांची याचिका सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असताना त्या ठिकाणी महापालिका निवडणुकीची प्रभागरचना कशाच्या आधारे केली, असा सवाल उपस्थित केला आहे. त्यामुळे २७ गावांत निवडणुका घेण्यात येऊ नयेत, अशी काँग्रेसने भूमिका घेत संघर्ष समितीच्या मागणीला पाठिंबा दिला.

#### ठाकरे गटाचा संघर्ष समितीला पाठिंबा

संघर्ष समितीच्या भूमिकेला शिवसेना ठाकरे गटाचा पाठिंबा असल्याचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी सांगितले. महाविकास आघाडी सरकारने २७ गावांपैकी १८ गावे वगळून त्याची स्वतंत्र नगरपालिका करण्याची प्रक्रिया सुरू केली होती. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका न्यायप्रविष्ट आहे. १८ गावे वगळण्यात आल्याचा जीआर २०२२मध्ये काढण्यात आला आहे. या जीआरला पालिका अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवली आहे. १८ गावे वगळण्यात आली तरी २७ गावांत प्रभागरचना कशाच्या आधारे केली, असा सवाल म्हात्रे यांनी उपस्थित केला आहे. २७ गावांवर निवडणुका लादू नयेत. त्यामुळे संघर्ष समितीच्या भूमिकेला उद्धव सेनेचा पाठिंबा आहे, असे ते म्हणाले.

## थोडक्यात बातम्या

### महावितरणची वीजबिलात वाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : ग्राहकांना पुन्हा एकदा वीजबिलात वाढीचा धक्का बसणार आहे. महावितरणने इंधन समायोजन शुल्क (एफएसी) वाढवून ते २० पैशांवरून ५५ पैसे प्रति युनिट करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सामान्य ग्राहकांसह औद्योगिक ग्राहकांनाही अतिरिक्त भार सोसावा लागणार असून, सरकारविरुद्ध रोष वाढला आहे. महावितरणने ५ सप्टेंबरला परिपत्रक जारी केले. त्यानुसार ऑगस्टच्या बिलिंगसाठी महाराष्ट्रातील सर्व ग्राहकांवर इंधन समायोजन शुल्क आकारण्याचे निर्देश दिले गेले. एप्रिल ते जून या कालावधीत हे शुल्क शून्य होते, तर जुलैमध्ये ते उणे होते. आता चार महिन्यांनंतर महावितरणने पुन्हा शुल्क वाढवले असून, सप्टेंबरमध्ये होणाऱ्या ऑगस्ट महिन्याच्या बिलिंगसाठी सुधारित दर लागू झाले आहेत. नवीन परिपत्रकानुसार, निवासी ग्राहकांसाठी एफएसी २० पैशांवरून ५५ पैसे प्रति युनिट करण्यात आले आहे. पॉवरलूम ग्राहकांसाठी मात्र हे शुल्क १२.५ पैशांवरून १५ पैसे प्रति युनिट इतके आहे. यामागे ५० टक्के अनुदानाचा घटक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

#### मदतवाहिनीवरून तपशील मिळवा

भिवंडीची फ्रँचायसी कंपनी असलेल्या टोरेंट पॉवरने सांगितले की, या वाढीबाबत सर्व ग्राहकांना एसएमएसद्वारे माहिती दिली आहे. तसेच, बिलावर स्पष्ट नोंद करण्यात येणार आहे. ग्राहकांना आवश्यक असल्यास सेवा केंद्रांमध्ये किंवा टोल-फ्री हेल्पलाइनवरूनही तपशील मिळवता येईल.

### मुंबईकरांना मिळणार वातानुकूलित वंदे मेट्रो

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /मुंबई : मुंबईकरांचा लोकल प्रवास आता आणखी आरामदायी आणि आधुनिक होणार आहे. मुंबई रेल्वे विकास निगम (एमआरव्हीसी) ने तब्बल २,८५६ पूर्णपणे वातानुकूलित वंदे मेट्रो (उपनगरी) डब्यांच्या खरेदीसाठी मोठी निविदा जाहीर केली आहे. हे डबे १२, १५ आणि १८ डब्यांच्या रॅक स्वरूपात धावणार असून, गर्दी कमी करण्यासोबतच प्रवास सुखकर आणि सुरक्षित होणार आहे.

सध्या बहुतेक लोकल १२ डब्यांच्या असल्या तरी काही गाड्या १५ डब्यांच्या आहेत. वाढत्या प्रवाशांच्या मागणीला लक्षात घेऊन या नव्या खरेदीत १५ डब्यांच्या गाड्यांना प्राधान्य दिले जाणार आहे, तसेच आवश्यकतेनुसार १८ डब्यांचे रॅकही आणले जातील. एमयूटीपी टप्पा ३ व ३ए अंतर्गत ६ सप्टेंबर रोजी ही निविदा जाहीर झाली. याअंतर्गत केवळ डबे खरेदीच नाही, तर पुढील ३५ वर्षे त्यांची देखभाल करण्याचाही समावेश आहे. यासाठी भीवपुरी (मध्य रेल्वे) व वाणगाव (पश्चिम रेल्वे) येथे दोन अत्याधुनिक डेपो उभारले जातील.

निविदा सादरीकरण ८ डिसेंबरपासून सुरू होईल, तर २२ डिसेंबर रोजी निविदा उघडण्यात येईल. हा प्रकल्प मेक इन इंडिया धोरणानुसार राबवला जाणार असल्याने देशांतर्गत उत्पादनाला चालना मिळणार आहे. करारानंतर दोन वर्षांत पहिला प्रोटोटाइप रॅक मुंबईत दाखल होणार आहे.

#### वंदे मेट्रो डब्यांची वैशिष्ट्ये

- पूर्णपणे वातानुकूलित व वेस्टिब्यूल्ड रॅक,- स्वयंचलित दरवाजे बंद प्रणाली, - गादीदार आसन, मोबाईल चार्जिंग व माहितीप्रद स्क्रीन, - १३० कि.मी. प्रतितास वेग क्षमता, - दोन्ही टोकांना विक्रेत्यांसाठी डबे,- उच्च क्षमतेची प्रगत सुरक्षा प्रणाली

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभाग रचना हरकतींवर पार पडली सुनावणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सन 2025 मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रारुप प्रभागांच्या भौगोलीक सीमा प्रसिध्द करणेकामी, आणि त्यावर हरकती, सुचना मागविण्यासाठी शुक्रवार दि.22 ऑगस्ट 2025 ते गुरुवार दि.04 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 03.00 पर्यंत कालावधी देण्यात आला होता. यावर एकुण 264 हरकती व सुचना प्राप्त झाल्या. या हरकती व सुचनांच्या सुनावणीसाठी राज्य शासनाने मा.श्री.दिपेंद्र कुशवाह, विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचनालय, महाराष्ट्र शासन यांना प्राधिकृत केले आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली आज महापालिका भवनातील मा.स्थायी समिती सभागृहात प्राप्त झालेल्या हरकतींवर प्रत्यक्ष सुनावणी घेण्यात आल्या.



या समयी महापालिका आयुक्त अभिनव गोयल, निवडणूक विभागाचे उपआयुक्त रमेश मिसाळ, सहाय्यक संचालक नगररचना संतोष डोईफोडे, महापालिका सचिव किशोर शेळके, नगररचनाकार सुरेंद्र टेंगळे, सचिन घुटे, नगररचना विभाग आणि निवडणूक विभागातील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

## मेट्रो ५ चा बदलापूर आगारापर्यंत विस्तार करा

### - माजी नगराध्यक्ष राम पातकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण - ठाणे, भिवंडी आणि कल्याण शहरे मेट्रो ५ प्रकल्पाच्या माध्यमातून बदलापूर शहराशी थेट जोडायची असतील तर बदलापूर शहराकडे येणारी मेट्रो ५ ही बदलापूर शहराजवळील चिखलोली गावापर्यंत मर्यादित न ठेवता या मेट्रोचा मार्ग बदलापूर बस स्थानकापर्यंत विस्तारणे आवश्यक आहे. चिखलोलीपर्यंत मंजूर झालेला मेट्रो ५ प्रकल्पाचा मार्ग बदलापूर पश्चिमेतील बस आगारापर्यंत विस्तारण्यात यावा. यासाठी आवश्यक मंजुरीच्या प्रक्रिया मेट्रो ५ प्रकल्पाचे काम सुरू होण्यापूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभागाला द्यावेत, अशी मागणी बदलापूरचे माजी नगराध्यक्ष आणि बदलापूर शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष राम पातकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

बदलापूर शहर परिसराचे झपाट्याने नागरीकरण होत आहे. लोकवस्ती वाढत आहे. त्याप्रमाणात या भागात रस्ते वाहतूक, रेल्वे, इतर वाहतूक सुविधा, पर्यायी रस्ते मार्ग, वाढीव पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत यासाठी माजी नगराध्यक्ष राम पातकर शासनस्तरावर प्रयत्नशील आहेत. अलीकडेच त्यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे शासनाने कर्जत तालुक्यातील मागील अनेक वर्षांचे रखडलेले पोशिर आणि शिलार धरण प्रकल्प मंजूर केले. बदलापूर, चिखलोली ते कर्जत-पनवेल लोकल प्रवासी वाहतुकीसाठी ते प्रयत्नशील आहेत.






# गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : सबऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन, मुंबई यांच्या वाशी परिमंडळाच्या वतीने ८ सप्टेंबर रोजी जे. एम.म्हात्रे प्राथमिक शाळा मोरा व न्यू इंग्लिश स्कूल, मोरा उरण येथील पहिली ते दहावी पर्यंतच्या गरीब गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय उपयोगी साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना २०० स्कूल बॅग १२ हजार वह्या, वेगवेगळया महान व्यक्तींची चरित्रे असलेली २०० पुस्तके पेन्सिल, खोडरबर, शार्पनर इ.असलेले दोनशे कंपास बॉक्स, चॉकलेट्स, कॅडबरी व इतर मुलांसाठी खाऊ वाटप करण्यात आले

या प्रसंगी सब ऑर्डीनेट इंजिनियर्स असोसिएशनचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक अभि. संजय ठाकूर वरिष्ठ उपाध्यक्ष, आयपीफ कार्यक्रमाध्यक्ष लक्ष्मण राठोड अध्यक्ष, नारायण चकोर संघटन सचिव श्रीनिवास बोबडे प्रादेशिक सचिव, कोकण दादासाहेब दाईंगडे दिनेश बागुल जितेंद्र साबळे निखिल पाटील आशिष इंगळे संजित करांडे कुलदीपसिंग राजपूत वाशी परिमंडळ सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

मार्गदर्शन करून सांगितले की सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला हातभार लावावा तसेच शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे व विद्यार्थी कुठे शिक्षणात मागे राहू नये, तसेच आम्ही दिलेल्या शैक्षणिक साहित्याचा वापर आपण आपल्या बुद्धीला चालना देण्यासाठी व व शैक्षणिक प्रगती करण्यासाठी करावाअसे मार्गदर्शन केल विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक साहित्य मिळवून देण्यासाठी शाळेच्या माजी विद्यार्थिनी सौ.रूपाली रुमडे व शिक्षक अनिल पाटील यांनी विशेष प्रयत्न केले. सदर कार्यक्रमास माध्यमिकचे चेअरमन पी.एम कोळी, चेअरमन चंद्रकांत कोळी, मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर, प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड, सहाय्यक शिक्षक सुगिंद्र म्हात्रे, मनोज म्हात्रे, स्वप्नील नागमोती, सौ.रोहिणी घरत, सौ.सुनिता पाटील, सौ सुप्रिया मुंबईकर सत्यवान मर्चंडे,सौ रुपाली चौधरी, सौ.कोल्हे मॅडम, सौ.राणी कदम विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल पाटील यांनी केले आभार साईनाथ गावंड यांनी केले.

# ‘इंडि’ आघाडीच्या खासदारांनी अंतरात्म्याचा आवाज ऐकला

## शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा राहुल गांधींना टोला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंडि आघाडीची मते फुटल्यानंतर शिवसेना खासदार व एनडीए उमेदवार प्रतिनिधी असलेल्या डॉ. श्रीकांत शिंदे यांनी काँग्रेसचे यात्रेकरु खासदार राहुल गांधीं यांच्यावर निशाणा साधला. गांधी यांच्या आवाहनानुसार इंडि आघाडीच्या खासदारांनी अंतरात्म्याचा आवाज ऐकला आणि एनडीएच्या उमेदवाराला मतदान केले, असा टोला खासदार डॉ. शिंदे यांनी लगावला.

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंडि आघाडीमध्ये फाटाफूट झाली. या निवडणुकीत एनडीएचे उमेदवार सी.पी राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीची ४५२ मते मिळाली. तर इंडि आघाडीचे उमेदवार निवृत्त न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना ३०० मते मिळाली. या निवडणुकीत विरोधकांची मते फुटली.

### उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंडि आघाडीची मते फुटली

यावरुन शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यांनी ट्विट करत राहुल गांधी यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी अंतरात्म्याचा आवाज ऐकून मतदान करा, असं आवाहन राहुल गांधीं यांनी इंडि आघाडीच्या खासदारांना केलं होतं. ‘इंडि’ आघाडीच्या खासदारांनी खरोखरच त्यांचं ऐकलं! अंतरात्म्याच्या आवाजाला जागून त्यांच्यापैकीच अनेकांनी आपलं पहिल्या पसंतीचं मत सी.पी राधाकृष्णनजींच्याच पारड्यात टाकलं. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वातील एनडीए सरकारवर विश्वास हाच अंतरात्म्याचा आवाज हे विरोधकांना उशीरा का होईना कळू लागलंय, असे खासदार डॉ. शिंदे यांनी म्हटले आहे. एनडीएला मतदान करणाऱ्या इंडी आघाडीच्या खासदारांचे खासदार डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

खासदार डॉ. शिंदे म्हणाले की, पंतप्रधान मोदीजी यांनी १० वर्ष केलेले काम, ऑपरेशन सिंदूर, केंद्र सरकारची धोरणे यामुळे एनडीए खासदारांबरोबरच विरोधी खासदार देखील प्रभावित झाले. त्यामुळेच उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विरोधी पक्षांच्या खासदारांनी मतदान केले. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी उमेदवार प्रतिनिधी म्हणून जबाबदार सांभाळली होती. मतांची जुळवाजुळव आणि विजयी रणनितीमध्ये खासदार डॉ. शिंदे यांचा सहभाग होता. एनडीए उमेदवार सी.पी राधाकृष्णन यांना अपेक्षेपेक्षाही जास्त मते मिळाल्याने एनडीएची भक्कम एकजूट कायम असल्याचे दिसून आले.

# केंद्र सरकारकडून ‘देशांतर्गत पर्यटन’ या विषयांवर सर्वेक्षण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भारत सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने आरोग्य आणि देशांतर्गत पर्यटनाविषयी दोन महत्त्वाची सर्वेक्षणे सुरू केली आहेत. ही सर्वेक्षणे जानेवारी 2025 ते जून 2026 या कालावधीत केली जाणार असून, ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी या सर्वेक्षणाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या उपसंचालक संगिता मोरे यांनी केले आहे.

भारत सरकारच्या अधिपत्याखालील सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाकडून राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, राष्ट्रीय नमुना पाहणीच्या 80 व्या फेरीचे क्षेत्रकाम माहे जानेवारी 2025 ते जून 2026 या कालावधीत होणार असून, या फेरी अंतर्गत “कुटुंबाचा सामाजिक उपभोगः आरोग्य” व “देशांतर्गत पर्यटन व त्यावरील खर्चाचे सर्वेक्षण” या विषयांवर पाहणी घेण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाचा उद्देश आरोग्य क्षेत्रविषयी मूलभूत सांख्यिकी माहिती गोळा करणे, शासनाकडून पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांच्या वापराचे मोजमाप करणे, सरकारी रुग्णालयांचा वापर किती प्रमाणात होतो, सरकारी व खाजगी क्षेत्रातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, out of pocket expenditure, सर्व वयोगटातील व्यक्तीचे लसीकरण, 15 ते 49 वयोगटातील गरोदर महिलांसाठी प्रसूती आणि प्रसूतीपूर्व व प्रसूती नंतर घेतलेल्या उपचारांबाबत तपशीलवार माहिती इ. बाबत सविस्तर माहिती या सर्वेक्षणाद्वारे गोळा केली जाणार आहे. ही माहिती आरोग्य विषयक योजनांची रचना करण्यासाठी वापरली जाणार आहे.

तसेच राष्ट्रीय नमुना पाहणीच्या देशांतर्गत पर्यटन व त्यावरील खर्चाचे सर्वेक्षण या विषयावर देखील सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणात देशांतर्गत केलेल्या प्रवासाची माहिती व त्यावर होणारा खर्च यांची माहिती घेतली जाणार आहे. संकलित केलेली माहिती टूरिझम सॅटेलाइट अकाऊंट (TSA) तयार करण्यासाठी वापरली जाईल. ही माहिती पर्यटन मंत्रालय, भारत सरकार यांच्याद्वारे गोळा करण्यात येणार आहे. तसेच, पर्यटन मंत्रालय ही माहिती UNWTO (United Nations World Tourism Organisation) ला प्रदान करेल, ज्याच्या आधारे Travel And Tourism Development Index तयार केला जाईल, या सर्वेक्षणातून आलेली माहिती देशाच्या पर्यटन विषयक योजना तयार करण्यासाठी वापरली जाईल. ही माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येते.

सर्वेक्षणाच्या क्षेत्रकामासाठी जिल्हा सांख्यिकी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना नियुक्त करण्यात आले आहे. कर्मचारी निवडक भागात प्रत्येक घरात जाऊन आरोग्य विषयक देशांतर्गत प्रवासविषयी माहिती गोळा करणार आहेत. या सर्वेक्षणातून गोळा केलेली माहिती शासनाच्या आरोग्य व पर्यटन विषयक धोरणांसाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे या सर्वेक्षणाची अचूक माहिती मिळण्याच्या दृष्टीने जनतेमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे. नागरिकांच्या सहकार्यातून अचूक व आवश्यक माहिती मिळणे सोईचे होईल. गोळा केलेली सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल.

तरी, नागरिकांनी या सर्वेक्षणासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या उपसंचालक संगिता मोरे यांनी केले आहे.

# कल्याणातून ७ बांग्लादेशी नागरिकांना अटक

## ६ महिला व १ पुरुष बांग्लादेशी नागरिकाचा समावेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मंगळवारी सायंकाळी 6 वा.चे सुमारास सपोनि भुजबळ व तपास पथकाचे पोलीस अंमलदार कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना कल्याण रेल्वे स्टेशन परिसरामध्ये ६ महिला संशयास्परित्या फिरत असताना मिळुन आल्या. या महिलांना म.पो.कॉ. धनगर यांच्या मदतीने ताब्यात घेउन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी त्या बांग्लोदश येथील असल्याचे सांगुन त्यांच्याकडे भारतामध्ये रहाण्याबाबतचा कोणताही वैध परवाना नसल्याचे सांगितले.

या 6 महिलांची महिला पोलीस अंमलदार यांच्या मदतीने अंगझडती घेतली असता त्यांच्या कडे असणारे



मोबाईलमध्ये ईमो ॲप व ८८ या सिरीयलने सुरू होणारे मोबाईल क्रमांकावर व्हॉट्सॲप द्वारे चॅटींग व कॉलींग केल्याचे दिसुन आले. तसेच काही महिलांकडे बांग्लादेश मधील जन्म प्रमाणपत्र, बांग्लादेश नॅशनल आय.डी. कार्ड असे बांग्लादेश नागरिक असलेबाबत पुरावे मिळुन आले. तसेच बुधवारी कल्याण रेल्वे स्टेशन परिसरामध्ये एक अनोळखी इसम मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेउन त्याच्याकडे विचारपुस करता त्याने तो बांग्लादेशी नागरिक असल्याचे कबुल केले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यामध्ये बांगलादेशातील बर्थ सर्टिफिकेट कागदपत्र मिळुन आले.

या बांगलादेशी नागरिकांमध्ये शिपा बलून पठाण, शर्मिन मोने रुल इस्लाम, रीमा सागर अहमद, सुमया अबुल कासिम, पौर्णिमा मोहम्मद सुलेमान अख्तर, जोया जास्मिन मतदार, रॉकी रहीम बादशाह यांचा समावेश आहे. या सर्वांकडे विचारपुस केली असता ते बांग्लादेशातुन छुप्या मार्गाने भारतामध्ये प्रवेश करून तेथुन ट्रेनने मुंबई येथे आले असल्याचे कबुल केले. याबाबत पोलीस पुढील योग्य ती कार्यवाही करत आहेत. हि कामगिरी पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बलीरामसिंग परदेशी, पोनि विजय नाईक, तपास पथकातील अधिकारी सपोनि स्वप्नील भुजबळ, पोउपनि जानुसिंग पवार, पो. हवा. साळुंखे, तडवी, पो.कॉ. वडगावे, कोळी, जाधव यांनी केली आहे.

# पालघर जिल्ह्यातील अनधिकृत प्रार्थना स्थळांवर कारवाई करा - संस्कृती रक्षण समिती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर ग्रामीण : पालघर जिल्ह्यातील असलेल्या अनधिकृत ख्रिश्चन प्रार्थना स्थळांवर कारवाई करुन धर्मांतर विरोधी कायदा करावा अशी मागणी संस्कृती रक्षण समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

संस्कृती रक्षण समितीच्या वतीने स्वामी भारतानंद सरस्वतीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील संस्कृती रक्षण करणारे मान्यवर मोहन महाराज शिंगडा , रवींद्र रहाळकर, महावीर सोलंकी, संतोष जनाठे , चंदन सिंग, अनंत कुडू, भारतीताई संखे, रवी शिवदे, प्रभाकर पाटील, मुकलेश गिरी तसेच जिल्ह्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी व ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून बाधित असलेल्या गावातील नागरिक यांच्या वतीने पालघर जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

येथील भोळ्याभाबड्या लोकांना विविध प्रकारची अमिषे दाखवली जात आहेत. परिणामी अशा येशू ख्रिस्ताच्या बैठकीला जाणाऱ्या लोकांमुळे व त्यांना शिकवायला येणाऱ्या ब्रदर -फादर-पास्टर-नन यामुळे गावोगावी सामाजिक वाद निर्माण होत असून आपली संस्कृती धोक्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील असलेल्या अनधिकृत ख्रिश्चन प्रार्थना स्थळांवर कारवाई करुन धर्मांतर विरोधी कायदा करावा अशी मागणी करण्यात आली असून तसं न झाल्यास महाराष्ट्रातील संपूर्ण संत-समाज, जिल्ह्यातील आदिवासी, शेतकरी, मजूर, स्थानिक भुमीपत्र, हिंदु समाजातील विविध संस्था, संघटना, बृहत हिंदू समाजाला सोबत घेऊन आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे

# मोखावणे जि.प. शाळेचा नेहरू विज्ञान केंद्राच्या उपक्रमात सहभाग



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : मोखावणे येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित नेहरू विज्ञान केंद्राच्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

शहापूर तालुक्यातील मोखावणे या जिल्हा परिषद शाळेत नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई यांच्या वतीने मोबाईल विज्ञान प्रदर्शन व्हॅनद्वारे विज्ञान विषयावर आधारित उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्त्व, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्वच्छता व आरोग्य तसेच विविध वैज्ञानिक तत्त्वांवर आधारित प्रयोग सादर करून दाखविण्यात आले. तर हॅन्डस-ऑन-मेक आणि टेक वर्कशॉप या अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग करण्याची संधी मिळाली वायुदाब, बल, गती, वायूचा प्रसार, ऊर्जा आदी संकल्पना विद्यार्थ्यांनी खेळकर पद्धतीने शिकण्याचा अनुभवून घेतला.

दरम्यान, कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञाना विषयी कुतूहल निर्माण होऊन शास्त्रीय दृष्टिकोन विकसित होण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक सचिन ढमणे यांनी म्हटले. या कार्यक्रमासाठी जेएसडबल्यु फाउंडेशन यांचे विशेष सहकार्य लाभले. तर शाळेचे मुख्याध्यापक सचिन ढमणे, शिक्षिका दीप्ती गांगुर्डे व पालक यांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

# तिसगाव नाक्यावरील कमानीचा मनपाच्याच्या सीसीटीव्हीला अडथळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : कल्याण पूर्वेतील पुणे लिंक रोड वरील तिसगांव नाक्यावरील महापालिकेने बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याला अडथळा निर्माण करून एका कमानीचा सांगाडा उभा करण्यात आला आहे. या कमानी मुळे पालिकेचे सीसीटीव्ही कॅमेरेही झाकले जाण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने ही कमान या परिसरात चर्चेचा विषय झाली आहे.

तिसगांव नाक्यावरील प्रसादम हॉटेल समोर महापालिकेने सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा कसल्याही प्रकारे विचार न करता ही कमान उभारण्यात आली आहे. पुणे लिंक रोडवर सातत्याने कुठे ना कुठे तरी वाहन अपघात होतच असतात. या अपघातांचे कारण शोधण्यासाठी अशा प्रकारच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा पोलीस यंत्रणेला मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असतांनाही अशा प्रकारे वाहतूकीला अडथळा निर्माण करणाऱ्या कमानी उभ्या करण्यासाठी वाहतूक पोलिस विभाग ना हरकत दाखला कोणत्या निकशांवर देते? असा सवाल सामान्य नागरिक करत आहेत.






# गणेशोत्सवाच्या निमित्ताने शैक्षणिक साहित्य वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : गणेशोत्सवातून सामाजिक बांधिलकी या ध्येयातून प्रेरित होऊन गणेश दर्शनानिमित्त गणेशभक्तांकडून प्राप्त झालेल्या विविध प्रकारच्या शैक्षणिक साहित्याचे वाटप शालेय विद्यार्थ्यांना जि.प.शाळा कासणे येथे मंगळवार दि.९/९/२०२५ रोजी गजानन जयवंत पाटील व सर्व पक्षीय युवा मोर्चा ता.कल्याण यांच्या मार्फत करण्यात आले.जि.प.शाळा कासणे येथील पदवीधर शिक्षक आणि शाळेचे मुख्याध्यापक मनोहर मडके यांच्या प्रयत्नांतून व डोंबिवली येथील सामाजिक कार्यकर्ते गजानन जयवंत पाटील यांच्या संकल्पनेतून तसेच महेश भाऊ संते,राम पाटील आणि संघटनेच्या



सर्व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रमासाठी कासणे येथील शिक्षणप्रेमी व उद्योजक भगवान भोईर,उपसरपंच नाना गोंधळी,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा धनश्री बोटकोंडले,ग्रामपंचायत सदस्या भावना भोईर,आशा हालके तसेच तसेच कासणे,खानिवली,खैरपाडा शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान जादूगार राम भोईर यांनी सादर केलेल्या जादूच्या प्रयोगांमुळे उपस्थितांमध्ये एक वेगळेच उत्साहाचे वातावरण निर्माण केले.सदर कार्यक्रमाचे नियोजन शिक्षक प्रमोद पवार , रुपाली परीट व लोहार मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन पदवीधर शिक्षक मनोहर मडके यांनी केले.






## आजचे राशि भविष्य



**मेष**
कुटुंबात विशेष लोकांचे आगमन होऊ शकते, तुम्ही त्याच्या तयारीत व्यस्त असाल. तुमच्या वैवाहिक जीवनात खूप आनंद असेल.

**वृषभ**
काही कामे वेळेपूर्वी पूर्ण केल्याने तुम्हाला आनंद मिळेल.इलेक्ट्रॉनिक्स व्यापाऱ्यांना लाभाची शक्यता आहे. वैवाहिक जीवनात जवळीक वाढेल.

**मिथुन**
नियोजित काम पूर्ण करण्यात यश मिळेल. स्थावर मालमत्तेशी संबंधित काम पुढे सरकेल. कुटुंबातील संपत्तीशी संबंधित कोणताही वाद सोडवला जाईल.

**कर्क**
व्यवसायात सुखद बदल होतील.जीवनात पैशाशी संबंधित काही समस्यांमुळे त्रस्त होऊ शकता. जीवनसाथीसोबत काही मुद्द्यावरून वाद होऊ शकतो.

**सिंह**
या राशीच्या सरकारी विभागातील कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होऊ शकते आणि लवकरच काही चांगली बातमी मिळेल.

**कन्या**
संध्याकाळी आपण बाहेर जेवू. मुलांशी परस्पर स्नेह वाढेल. शिक्षकांच्या बदलीच्या अडचणी संपतील, हव्या त्या ठिकाणी बदल्या होतील.

**तूळ**
वरिष्ठांची मदत मिळेल. खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये निष्काळजीपणा आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक**
एखादी छोटीशी बाबही भांडणाचे रूप धारण करू शकते, ज्यामुळे तुम्ही अडचणीत येऊ शकता. जोडीदारासाठी काही खास करू शकता.

**धनु**
तुमच्या मेहनतीने व्यवसायात प्रगती कराल. तुम्हाला चांगली बातमी मिळेल.तुमची नियोजित कामे वेळेवर पूर्ण होताना दिसत आहेत.

**मकर**
आर्थिक स्थिती मजबूत होईल. आज व्यवसायात यशाच्या अनेक संधी मिळतील. मित्र तुमचे मनोबल वाढवतील. आरोग्य सुधारत राहील.

**कुंभ**
कायदेशीर कामासाठी धावपळ केल्यामुळे थकवा जाणवेल. आज आपल्याला वैवाहिक जीवनात एकमेकांना समजून घ्यावे लागेल.

**मीन**
तुम्ही नवीन व्यवसाय सुरू केला असेल तर त्यात चांगला नफा मिळेल.मन एखाद्या गोष्टीबद्दल खूप आनंदी असेल. सुखद क्षण अनुभवाल.

नियमित वाचा दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

# बी.एन.एन.महाविद्यालयात रानभाज्यांचे प्रदर्शन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : आदिवासी आणि भटके-विमुक्त समाज हा निसर्गाच्या सान्निध्यात राहून परंपरा,संस्कृती व मूल्यांचे रक्षण करणारा आपल्या भारताचा अमूल्य ठेवा आहे असे गौरवशाली उद्गार खासदार डॉ.हेमंत सावरा यांनी भिवंडीत आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

भिवंडीतील पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ संचालीत बी.एन.एन.महाविद्यालयात आदिवासी भटके विमुक्त प्रेरणा महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुंबई विद्यापीठातील उप निबंधक कृष्णा पराड, संस्था कार्याध्यक्ष बी डी काळे,महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुवर्णा रावळ, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी संतोष भोये, श्रीराम भोईर, आर.एन. पिंजारी,मुख्याध्यापक सुधीर घागस, नारायण पाटील, दीपक परभणकर, महाविद्यालयाचे सर्व उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मयोगीसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या समाजातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून नागरी समाजाला आदिवासी संस्कृती व जीवनशैलीची ओळख समजावून,सामाजिक आणि शैक्षणिक उन्नती साठी प्रेरणा वृद्धिंगत करून संस्कृती जपणारा महाविद्यालयाचा उपक्रम उल्लेखनीय असल्याचे मत खासदार डॉ.हेमंत सावरा यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. पद्मश्री अण्णासाहेब जाधव यांनी

### आदिवासी आणि भटके विमुक्त समाज हा भारतीय संस्कृती परंपरा देव, देश आणि धर्माचा रक्षण करणारा – खा. हेमंत सवरा

आदिवासी आणि भटके विमुक्त या समाजाच्या अडचणी समजून घेत त्यांच्यासाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिली. आदिवासी समाजाची संस्कृती,परंपरा,जीवनशैली याचा परिचय झाला पाहिजे या साठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्था कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे यांनी दिली.आदिवासी आणि भटके विमुक्त समाजासाठी हा महोत्सव केवळ मनोरंजनाचा नसून प्रबोधनाचा आहे अशी माहिती प्राचार्य डॉ. सुवर्णा रावळ यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात दिली.

यावेळी वारली पेंटिंग,चित्रकथी,आदिवासी घरांची प्रतिकृतीचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.विद्यार्थ्यांना भाजीपाला विक्रीच्या माध्यमातून विद्यार्थी दशेतच व्यवहारिक ज्ञान आकलन व्हावे यासाठी रानभाज्या प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी रोखीने आणि डिजिटल पद्धतीने भाजी विक्री करत व्यवहारी ज्ञान आत्मसात केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या धस, शुभांगी अमृतकर, प्रियंका ठाकूर तर आभार एम ओ महाले यांनी मानले.

# जोहेच्या राजाच्या पहिल्या महाआरतीचा मान न्यू इंग्लिश स्कुलला



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गणपती बाप्पाच्या मूर्तीचे माहेरघर म्हणून संपूर्ण देशात ओळख असलेल्या पेण तालुक्यातील गणेश मूर्तीचे हब जोहे गावात साखरचौथ निमित्त जोहेचा राजाची पाच दिवसांसाठी स्थापना करण्यात आली आहे. यावेळी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरच्या न्यू इंग्लिश जोहेच्या शेकडो विद्यार्थी विद्यार्थिनी, शिक्षकवर्ग यांच्या हस्ते जोहेच्या राजाची पहिली महाआरती संपन्न झाली.

वर्षभर गणेश मूर्ती बनविण्यात पेण तालुक्यासह जोहे गावातील जेष्ठ, महिला व युवा वर्ग व्यस्त असतो. मात्र श्रीगणेश चतुर्थी गणेशोत्सव झाल्यानंतर पहिल्या संकष्टी चतुर्थीला विशेषतः पेण, पनवेल, उरण आदी तालुक्यात घरगुती व सार्वजनिक स्वरूपात मोठ्या प्रमाणात साखरचौथ गणपती सण साजरा केला जातो. त्याचप्रमाणे 2013 साली स्थापन झालेल्या तसेच शालेय विद्यार्थी दत्तक घेणे, महिलांसाठी वेगवेगळे शिबीर, रक्तदान शिबिर आयोजित करणे आदी सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या जोहेचा राजा प्रतिष्ठान तर्फे साखरचौथ गणपती बाप्पा विराजमान झाले आहेत.

यावेळी वेगवेगळया क्षेत्रात असंख्य विद्यार्थी घडविणाऱ्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश जोहेच्या शेकडो विद्यार्थ्यांना जोहेचा राजाच्या पहिल्या महाआरतीचा मान देण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य उत्तम गलांडे शिक्षक व विद्यार्थी यांच्या हस्ते राजाची महाआरती संपन्न झाली. याप्रसंगी गायक लावण्या महेश पाटील हिच्या सुमधुर आवाजाने व पार्थ सागर पाटील याच्या साथीने राजाची महाआरती घेण्यात आली. उपस्थित शेकडो विद्यार्थ्यांना प्रतिष्ठान तर्फे वही, पेन, आरती संग्रह व खाऊ वाटप करण्यात आला.

या महाआरतीस अभिजित पाटील, संतोष घरत, गवळी, जोहेचा राजा प्रतिष्ठानचे संस्थापक देवा पेरवी, अध्यक्ष नारायण म्हात्रे, कार्याध्यक्ष विनोद म्हात्रे, वैभव धुमाळ, कमलाकर बोरकर, रवींद्र रसाळ, धनंजय पाटील, दीपक पाटील, निनाद धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिक्षण मंत्र्यांचा शिक्षण तज्ज्ञांशी संवाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : दादाजी भुसे, शालेय शिक्षण मंत्री यांनी दिनांक 9.9.25 रोजी राज्यातील शिक्षण तज्ज्ञांशी अनौपचारिक गप्पांद्वारे मनमोकळा संवाद साधला आणि विविध शिक्षण विषयक प्रश्नांवर राज्यातील शिक्षण तज्ज्ञांची भूमिका जाणून घेतली.

महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि काळानुरूप व्हावी यासाठी राज्यातील शिक्षण अभ्यासक, शिक्षणतज्ज्ञ, , भाषातज्ज्ञ यांच्याशी शिक्षणमंत्री नामदार दादाजी भुसे यांनी अनौपचारिक गप्पांद्वारे सुसंवाद साधला. या गप्पांचा विषय होता शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा.

या चर्चेत प्रसिद्ध दिग्दर्शक-अभिनेते मंगेश देसाई, शिक्षण अभ्यासक हेरंब कुलकर्णी, प्रतिभा भराडे, प्रवीण काळम पाटील, संदीप वाकचौरे, शिक्षण विकास मंचचे समन्वयक माधव सूर्यवंशी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. गीता शिंदे तसेच प्रा. डॉ. राजेश बनकर आदी मान्यवर सहभागी झाले होते.

खासदार संदीपन भुमरे ही यावेळी उपस्थित होते त्यांनीही मौलिक सूचना मांडत शैक्षणिक पायाभूत सुविधा आणि ग्रामीण शाळांच्या समस्या यावर भर देण्याची गरज अधोरेखित केली. बैठकी दरम्यान शिक्षक-विद्यार्थी संबंध, अध्यापनातील सर्जनशीलता, नाट्यकलेद्वारे शिक्षण प्रभावी करण्याचे मार्ग, भाषाशिक्षण, मातृभाषेचे महत्त्व, डिजिटल साधनांचा वापर, तसेच ग्रामीण-शहरी शैक्षणिक दरी कमी करण्याच्या उपाययोजना यावर सखोल चर्चा झाली. तज्ज्ञांनी शिक्षणातील नवनवीन प्रयोग आणि जागतिक दर्जाचे मानदंड गाठण्यासाठी धोरणात्मक बदलांची गरज व्यक्त केली.

**महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि काळानुरूप व्हावी यासाठी राज्यातील शिक्षण अभ्यासक, शिक्षणतज्ज्ञ, , भाषातज्ज्ञ यांच्याशी शिक्षणमंत्री नामदार दादाजी भुसे यांनी अनौपचारिक गप्पांद्वारे सुसंवाद साधला. या गप्पांचा विषय होता शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा.**

शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी सर्व मान्यवरांची भूमिका समजून घेतली आणि पुढील काळात अशा चर्चांचा विस्तार करून त्यातून आलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचा मनोदय व्यक्त केला . "महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण , दर्जेदार आणि रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे यासाठी समाजातील विविध घटकांचा सहभाग महत्त्वाचा आहे," असे ते म्हणाले.यावेळी शिक्षणमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणी, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी हेल्थ कार्ड विकसित केले जाणार आहे. तसेच "आनंददायी शनिवार" या संकल्पनेअंतर्गत राष्ट्रभक्तीपर संगीतमय कवायत, क्रीडा व सैनिकी शिक्षण , याशिवाय शिक्षकांसाठी कला-कीडा स्पर्धा या विषयांवर प्रकाश टाकला .अध्ययन अध्यापनासोबतच सांस्कृतिक व कलात्मक सहभाग वाढविण्याची गरज व्यक्त केली .

बैठकीतून शिक्षक प्रशिक्षण, अभ्यासक्रम समृद्धी, सांस्कृतिक दृष्टिकोनातून शिक्षणाची उन्नती आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे यासंदर्भात सूचना पुढे आल्याने आगामी काळात ठोस निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होईल,आणि पुढील वर्षी राज्यातील शैक्षणिक गुणवत्तेचे चित्र पूर्वीपेक्षाही उत्तम असेल, असा आशावाद व्यक्त केला.

# 'रेनी कार्निव्हल' संवाद तरूणाईचा कार्यक्रमाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : शिव,बिरसा, फुले,शाहू,आंबेडकरी चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी आजचे युवक, युवती एकत्र येऊन काम करणे खूप गरजेचे आहे. तसेच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांना विचारमंच उपलब्ध करून देण्यासाठी समता संघर्ष संघटन व समता संघर्ष सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांसाठी "रेनी कार्निव्हल" संवाद तरूणाईचा या कार्यक्रमाचे आयोजन रविवार दिनांक




१४ सप्टेंबर रोजी भिवंडी तालुक्यातील पडघा-पाच्छापूर रोड जवळील रिव्हर टच अँग्रो फार्म (दोंदे फार्म हाऊस) येथे ठीक सकाळी ९-३० ते सायं.५-३० वाजता करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका कार्यकारी संपादक ,वृत्तपत्र लेखक उत्तम जोगदंड आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून लेखिका, पटकथा लेखिका, महामानवाची गौरवगाथा आणि फुलराणी या टीव्ही मालिकांची संवाद लेखिका शिल्पा कांबळे उपस्थित राहणार असून तरुणांशी संवाद साधणार आहेत.तसेच ठाणे जिल्ह्यातील तरुण, तरूणी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कविता, गाणी, समुहगिते, एकपात्री, समुह-संवाद गृप चर्चा, सादर करणार आहेत. तरी सदर कार्यक्रमात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आमदार किसन कथोरेंच्या वाढदिवसानिमित्ताने मोफत आरोग्य शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील असोसे येथील भाजपा युवा कार्यकर्ता व आमदार कथोरेंचे खंदे समर्थक मयुर मनोहर एगडे यांनी आमदार किसन कथोरेंच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन असोळे पंचायत समिती गणामध्ये नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. आज दि.11 सप्टेंबर रोजी मौजे असोसे येथून या शिबिराची सुरुवात केली असून असोळे गणातील असोसे, करवेळे,वाघिवली,असोळे, झापवाडी, शिदगाव, हिरेघर,किशोर अशा अनेक गावामध्ये संपूर्ण आठवडाभर अशा प्रकारचे नियोजन केले असून जर्मन टेक्नॉलॉजी मशीनद्वारे प्रत्येक माणसाचे फ्री




चेकअप करून त्याचे रिपोर्ट दिले जाणार आहेत.यामध्ये वजन कमी करणे,वजन वाढविणे, पाठ, मान, कंबर,मुळव्याध ,गुडघेदुखी, स्टोन, थायरॉईड,ब्लड शुगर, कोलेस्ट्रॉल अशा विविध प्रकारच्या मोफत तपासण्या केल्या जात असून गंभीर आजारावर उपचार सुद्धा केले जाणार असल्याची माहिती आयोजक मयुर एगडे यांनी दिली आहे.

आज पासून सुरुवात झालेल्या या शिबिरास असोसे गावातील जेष्ठ नागरिक व महिला वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला असून इतर गावातील सुद्धा नागरिक व माता भगिनींनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन मयुर एगडे यांनी केले आहे. लवकरच महिलांसाठी मोफत कॅन्सर चेकअपचे सुद्धा आयोजन केले जाणार असल्याची माहिती यावेळी एगडे यांनी दिली.

# वाडा ग्रामीण रुग्णालयातील वातानुकूलीत यंत्रणा पुन्हा बंद

## शस्त्रक्रिया कक्षातील यंत्रणा बंद असल्याने गैरसोय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : वाडा ग्रामीण रुग्णालयातील शस्त्रक्रिया कक्षातील वातानुकूलित यंत्रणा बंद पडल्याने शस्त्रक्रिया कक्ष हा अनेक दिवसांपासून बंद राहिला होता मात्र वातानुकूलित यंत्रणेची दुरुस्ती झाल्यानंतर पुन्हा ही यंत्रणा बंद पडली आहे. त्यामुळे रुग्णांची मोठी गैरसोय पहावयास मिळत आहे. वाडा तालुक्यासह विक्रमगड, शहापूर या तालुक्यांचा आधार असलेली वाडा ग्रामीण रुग्णालयाची आरोग्य यंत्रणा मागील काही दिवसांपासून कोलमडली होती. याबाबत पालघर जिल्हा



शल्यचिकित्सक डॉ. रामदास मराड यांनी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. यादव शेखरे यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी सूचना दिल्याने आरोग्य विभागाकडून हालचाली सुरू झाल्या होत्या.

दरम्यान, वातानुकूलित यंत्रणा दुरुस्त करणाऱ्या एजन्सी कडून शस्त्रक्रिया विभागातील वातानुकूलित यंत्रणा दुरुस्त करण्यात आली. त्यामुळे सुरळीत शस्त्रक्रिया होवून रुग्णांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, दुरुस्तीनंतर दुसऱ्याच दिवशी ही वातानुकूलित यंत्रणा पुन्हा बंद पडल्याने केलेली अपेक्षा फोल ठरली असून त्यामुळे आरोग्य सेवेचा पुन्हा बोजवारा उडाल्याचे पहायला मिळाले. शस्त्रक्रिया कक्षामधील वातानुकूलित यंत्रणा मागील २५ दिवसांपासून बंद राहिल्यामुळे प्रसूती आणि इतर शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल होणाऱ्या महिलांना नाहक त्रास झाला आहे. प्रसूती शस्त्रक्रियेसाठी ठाणे, भिवंडी येथील शासकीय रुग्णालयात अथवा तालुक्यातील इतर खासगी रुग्णालयांचा आधार घेण्याची पुन्हा वेळ आली असून गोरगरीब रुग्णांना मोठ्या आर्थिक भुर्दंडाबरोबरच मानसिक त्रासही सहन करावा लागत आहे.

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

## भिवंडी.जि.ठाणे.

## पाणी पुरवठा विभाग

### ई - निविदा सुचना क्रमांक - २६ (पहिल्यांदा प्रसिध्दी) सन २०२५-२६

खालील काम करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजित खर्च | निविदा फॉर्म फी | निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | वॉड क्र.५ सौदागर मोहल्ला येथे निडा कलेक्शन पासून ते खान भाई यांचे घर, कारगा मस्जीद गल्ली ते मदारछल्लया पर्यंत २२५ मी.मी मलवाहिनी टाकणेबाबत. सन २०२५-२६ या. | रु. ४,२९,८४१/- | रु. २३६०/- | दि. १२/०९/२०२५ ते दि. १९/०९/२०२५ |
| | सदर निविदा बाबतची माहिती मनपा संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in वर दिनांक १२/०९/२०२५ पासुन उपलब्ध आहे | | | |

जा.क्र./ज.सं.वि./९८९
दि. ११/०९/२०२५

सही /-
प्र. कार्यकारी अभियंता,
पाणी पुरवठा विभाग
भिवंडी नि. शहर महानगरपालिका भिवंडी.

# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विशेष कर्ज धोरण योजनेचा लाभ द्यावा

## – महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामध्ये वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजनेच्या लाभार्थी महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी व आर्थिकरित्या सक्षम करण्यासाठी विशेष कर्ज धोरण राबविण्यात येत आहे. या कर्ज योजनेशी सांगड घालण्यासाठी महामंडळांनी मुंबई बँकेशी करार करावा असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

मुंबई बँकेने सुरू केलेल्या विशेष कर्ज योजना, अंगणवाडी बांधकाम संदर्भात मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री आदिती तटकरे बोलत होत्या. या बैठकीस बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, आमदार चित्रा वाघ, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, विभागाचे सहसचिव वि. रा.ठाकूर, वित्त विभागाचे सहसचिव स्मिता निवतकर, सहसचिव मु. प्र. साबळे, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रताप पवार, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक आनंद लोमटे आदि अधिकारी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मुंबई बँकेला व्याज परतावा योजनांसाठी प्राधिकृत करून




तातडीने सामंजस्य करार करावा. महामंडळाच्या व्याज परतावा योजनेच्या लाभार्थी महिलांना लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभ देण्यात येणार असल्याने यांना अपात्र ठरवता येणार नाही. यासंदर्भात विशेष सूचना जारी करण्यात याव्यात. या योजनेच्या माध्यमातून मुंबईतील पात्र महिलांना आर्थिकरित्या सक्षम करण्यास सहकार्य लाभणार आहे. मुंबई बँकेच्या या उपक्रमांतर्गत महिलांना एक लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळणार आहे. यामध्ये 5 ते 10 महिला एकत्र येऊन व्यवसाय करू शकतात. ₹ १०,००० ते ₹ १,००,००० पर्यंत कर्ज उपलब्ध करण्यात येणार आहे असे मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी सांगितले. मुंबई बँकेची मुंबईत एकूण १६.०७ लाख बचत खाती आहेत. त्यापैकी "माझी लाडकी बहीण योजना" अंतर्गत ५३,३५७ महिलांची शून्य शिल्लक खाती उघडली. पात्र महिलांना शासनाकडून दरमहा ₹ १५०० थेट खात्यात जमा होत आहेत.

अंगणवाडी बांधकामात युनीफॉर्मिटी व आधुनिक तंत्राचा वापर आवश्यक राज्यातील अंगणवाड्यांच्या बांधकामात एकसमान पद्धत असावी तसेच

**अंगणवाडी बांधकामात युनीफॉर्मिटी व आधुनिक तंत्राचा वापर आवश्यक राज्यातील अंगणवाड्यांच्या बांधकामात एकसमान पद्धत असावी तसेच आधुनिक तंत्राचा वापर करून अंगणवाड्या उभाराव्यात असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.**

आधुनिक तंत्राचा वापर करून अंगणवाड्या उभाराव्यात असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. अंगणवाड्या उभारताना राज्यभर एकच पद्धत वापरावी तसेच आधुनिक तंत्राचा वापर करावा. वीज पुरवठा करताना ऊर्जा बचतीसाठी सोलार प्रकल्पाला प्राधान्य द्यावे. तसेच अंगणवाडीमध्ये पुरवठा करण्यात येणाऱ्या पोषण आहाराची गुणवत्ता वाढावी यासाठी तातडीने उपाययोजना आखाव्यात. बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी अंगणवाडी महत्वपूर्ण भूमिका बजावत असताना त्यांचे आरोग्य आणि शिक्षण उत्तम दर्जाचे देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्या म्हणाल्या.



## जनसुरक्षा विधेयक की जनता दडपशाही विधेयक? - वळ्ली राजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्रात आणलेलं हे विधेयक नावाने 'जनसुरक्षा' असलं तरी प्रत्यक्षात हे जनतेच्या सुरक्षेपेक्षा सरकारच्या खुर्चीची सुरक्षा करण्यासाठी आहे. त्यामुळे जनसुरक्षा विधेयक की जनता दडपशाही विधेयक असा सवाल सामाजिक कार्यकर्ते वळ्ली राजन यांनी उपस्थित केला आहे. लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला प्रश्न विचारण्याचा, आंदोलन करण्याचा आणि शासनाविरोधात आवाज उठवण्याचा घोषित अधिकार आहे. पण या विधेयकामुळे जनतेच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरणं गुन्हा ठरेल. भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन करणं गुन्हा ठरेल. सरकारला जबाबदार धरणं गुन्हा ठरेल. म्हणजेच, लोकशाही वाचवण्यासाठी उभं राहणं हेच लोकशाहीविरोधी ठरणार आहे. हे सरकार सुरक्षेच्या नावाखाली जनतेचा आवाज दाबण्याचा कट रचत आहे. महाराष्ट्राच्या भूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य घडवलं, तिथे आज जनता परत गुलामीत ढकलली जात आहे.

हे विधेयक स्वीकारणं म्हणजे आपल्या भविष्यातील पिढ्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणं. महाराष्ट्राची जनता गुलाम नाही, ती कधीच गुलाम होणार नाही. जनसुरक्षा नव्हे, ही तर जनतेची गळचेपी आहे. महाराष्ट्राचं लोकशाहीवरचं प्रेम कधीच कमी होणार नाही. जनतेचा आवाज दाबण्याचा प्रत्येक प्रयत्न जनता रस्त्यावर उतरून मोडून काढेल असे मत वळ्ली राजन यांनी व्यक्त केले आहे.

## उज्वला मंडळाचा ७६ वा शारदोत्सव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण मधील उज्वला मंडळाच्या शारदोत्सवाचा एक भाग म्हणून रविवार दि. १२ सप्टेंबर रोजी सकाळी ११वाजता "माणिक मोती" हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. पद्मश्री माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधत अशोक हांडे यांचा हा रसिक मान्य कार्यक्रम अत्रे रंग मंदिरात होईल. शारदोत्सव दि. २२ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर अभिनव विद्या मंदिर सभागृह, पारनाका कल्याण येथे होईल. वेळ सायं ५.३० वाजता असून श्री स्वामी समर्थ मंडळाचे —देवी सूक्त, मी 'ती'स्त्री वक्त्या प्राची गडकरी, पसायदान वक्ते विशाल कवीश्वर, डोंबिवली. 'शककर्ते शिवराय' अभयराजे जगताप ठाणे. ही अभ्यासपूर्ण व्याख्याने आयोजिली आहेत. भोंडल्याने शारदोत्सवाची सांगता होणार असल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षा सुनीता केळकर यांनी दिली.

## अनुसूचित जमाती कल्याण समितीने केडीएमसी प्रशासनाला धरले धारेवर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या लोकवस्तीना पुरविल्या जाणाऱ्या मूलभूत नागरी सुविधा करिता शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीचा पाच टक्केही निधी खर्च केला नसल्याने आजही अनुसूचित जमातीचे गाव पाडे नागरी सोयी सुविधा पासून वंचित असल्याने अनुसूचित जमाती कल्याण समितीने केडीएमसी प्रशासनाला धारेवर धरल्याची माहिती सुत्रांनी दिली. अनुसूचित जमाती कल्याण समितीने बुधवारी कल्याण डोंबिवली महापालिकेस भेट दिली. समितीने महापालिका आयुक्तांसोबत बैठक घेतली. या बैठकीत समितीने महापालिका प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. समितीचे अध्यक्ष दौलत दरोडा यांनी बुधवारी महापालिकेस भेट दिली होती. यावेळी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्यासोबत समितीची बैठक पार पडली. या बैठकीत समितीने महापालिकेच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त केली. या बैठकी दरम्यान अनुसूचित जमातीच्या संघटनेचे रामनाथ भोजने व माजी नगरसेविका शीतल मंढारी व अन्य पदाधिकरी यांनी समितीच्या अध्यक्षाची भेट घेतली. व त्यांनी या बैठकीत आपली व्यथा कथित केली. महापालिका हद्दीतील विजयनगर, टिटवाळा आणि आंबिवली आदि परिसर अनुसूचित जमातीच्या लोकवस्तीचे आहेत. या वस्तीला नागरी सोयी सुविधा पुरविण्याकरीता जवळपास १७ कोटी निधी येतो. प्राप्त निधी पैकी पाच टक्के निधी हा या लोकवस्तीत खर्च करणे अपेक्षित आहे. या लोकवस्तीत नागरी सोयी सुविधा, शिक्षण, दिवा बत्ती आणि शिक्षणाच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या नसल्याने आजही अनुसूचित जमातीचे गाव पाडे नागरी सोयी सुविधा पासून वंचित असल्याचे निदर्शनास आणून दिल्याने समितीने महापालिकेच्या कामकाजावर तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करीत प्रशासनाला धारेवर धरले.

त्याचबरोबर महापालिका हद्दीत आदिवासी भवनाची उभारणे करणे आवश्यक आहे. याशिवाय अनूसूचित जमातीमधील थोर पुरुषांचे चौक उभारणे. ते सुशोभित करणे. त्यांची योग्य प्रकारे देख भाल ठेवणे या प्रमुख मागण्या समितीने या बैठकीत लावून धरल्या होत्या अशी माहिती सूत्रांनी दिली.

## ठाणे जिल्हा प्रशासन आयोजित छायाचित्रण स्पर्धेत तीन छायाचित्रकारांना मिळणार आकर्षक बक्षिसे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्याचे सौंदर्य आणि समृद्ध संस्कृती जगासमोर आणण्याच्या उद्देशाने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने एक अनोखी 'छायाचित्रण स्पर्धा 2025' आयोजित केली आहे. जिल्ह्यातील निसर्गाची भव्यता, वन्यजीव, लोकजीवन आणि बदलत्या ठाण्याचे विविध पैलू टिपण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून सर्व हौशी, नवोदित, व्यावसायिक छायाचित्रकारांसह नागरिक, विद्यार्थी आणि शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनाही एक उत्तम संधी मिळणार आहे.

या स्पर्धेमध्ये 1) 'वन्यजीव', 2) 'निसर्ग', 3) 'संस्कृती आणि परंपरा' तसेच 4) 'बदलते ठाणे आणि विकास प्रकल्प' या चार विषयांवर आधारित छायाचित्रे स्वीकारली जातील. प्रत्येक छायाचित्रकाराला प्रत्येक विषयासाठी जास्तीत जास्त 4 छायाचित्रे पाठवता येतील. एकाच विषयाचे चार फोटो असल्यास Category_Name_mobile number_1; Category_Name_mobile number_2 ; Category_Name_mobile number_3 ; Category_Name_mobile number_4 अशी नावे देवून पाठवावीत. ही छायाचित्रे उच्च दर्जाची (High-Resolution HD 10MB) असणे आवश्यक आहे. ही छायाचित्रे thanedio2025@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवायची आहेत. छायाचित्रे सादर करण्याची अंतिम तारीख 17 सप्टेंबर 2025, सायंकाळी 5 वाजेपर्यंत आहे.

स्पर्धेतील उत्कृष्ट छायाचित्रांची निवड तज्ज्ञ समितीद्वारे केली जाईल. निवड झालेल्या पहिल्या तीन

### निवडक १०० छायाचित्रांना 'कॉफीटेबल बुक'मध्ये स्थान छायाचित्रे पाठविण्याची अंतिम मुदत १७ सप्टेंबर

उत्कृष्ट छायाचित्रांना आकर्षक बक्षिसे आणि मानपत्र देऊन गौरविण्यात येणार असून यातून निवडलेल्या अंतिम 100 छायाचित्रांना संबंधित छायाचित्रकाराच्या नावासह ठाणे जिल्ह्याच्या नियोजित 'कॉफीटेबल बुक'मध्ये स्थान मिळेल. या स्पर्धेचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जपून तो सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे आहे.

ही स्पर्धा ठाणे जिल्ह्याच्या कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. यासाठी नागरिकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

## पेण शहराची वाढती लोकसंख्या आणि थकलेल्या नागरी सुविधा

### - सी.आर.म्हात्रे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यातील पेण शहर म्हणजे बाप्पाची नगरी होय. एक ऐतिहासिक ,सांस्कृतिक आणि पूर्वीपासूनच व्यापारी केंद्र होय, पूर्वीची वाडा संस्कृती लोप पावत आहे.आज जेएसडब्ल्यू कंपनीमुळे प्रचंड बाहेरील कामगार ,व्यापारी, विकासक पेण मध्ये आपले बस्तान बसवत आहेत,त्यामुळे प्रचंड लोकसंख्या वाढत आहे.. त्याचा फटका शहराला बसत आहे.नव्याने समस्या निर्माण होत आहेत ,याचा ताण नगरपरिषद प्रशासनाला बसत आहे.मूलभूत गरजांची यादी दिवसेंदिवस वाढत आहे.सर्वात मोठी समस्या वाहतूक कोंडीची. दुपारची आणि संध्याकाळच्या वेळेची असते, अरुंद रस्ते ,हातगाड्या ,,खरेदीसाठीची झुंबड,हे चित्र भयावह असते.बिचारे पोलिस बंधू यांना हे त्रासदायक असते. दुपारी तर शाळेच्या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज चौक ते एसटी स्टँड पर्यंत ट्रॅफिक असते.

जवळच पार्किंग व्यवस्था नसल्याने दुचाकी मिळेल त्या ठिकाणी पार्क करतात,चारचाकी वाहनाची हालत अवघड असते ,मुख्य बाजारपेठ जवळ असल्याने दूरवर वाहने कोणीही पार्क करत नाहीत. याचे शिस्तबद्ध नियोजन करणे गरजेचे आहे अशी मागणी पेण तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी केली आहे.

पेणचा पाणी प्रश्न गंभीर होत आहेच तो नदीपात्रातील पाणी फिल्टर करून एवढ्या लोकसंख्येला वेळेत देणे अवघड बनत आहे..हेटवणे धरणाचे शुद्ध पाण्यासाठीचे प्रयत्न यशस्वी झाले तर ही डोकेदुखी संपेल अशी वाटते.जुनी पाइप लाइन सतत दुरुस्त करावी लागते. शासन दरबारी असणारे प्रस्ताव पूर्णत्वास यावे ही अपेक्षा.नवीन बांधकाम सात मजल्यापासून पुढे वाढीव मजल्यांना परवानगी मिळत आहे. त्यांना पाणी,रस्ते,पार्किंग व्यवस्था नसेल तर नव्याने समस्या निर्माण होतील.पार्किंग सर्वच मालकांना मिळणार नाहीच मग त्या गाड्या रस्त्यावरच कोंडी करणार.

घंटा गाड्या वेळेवर फिरतं असतात मात्र कंपनीचे कामगार सकाळी लवकर,आणि रात्री उशिरा ड्युटीवर. जाताना कोठेतरी मोकळ्या जागेत कचरा फेकून जातात त्यामुळे रस्त्याच्या कडेने कचरा विखुरलेला दिसतो.

प्लास्टिक ,पाण्याच्या बाटल्या ,प्लास्टिक कप सर्रास गटारात फेकून दिले जाते त्यामुळे पावसाळ्यात गटारे तुंबून पाणी रस्त्यावरून वाहते. पूर्वीची लोखंडी गटारे कामगारांना स्वच्छतेसाठी अडचण निर्माण करत आहेत त्यांना इजा होतात त्यामुळे त्या गटारांची स्वच्छता करणे धोकादायक ठरतात. लोकसंखेच्या वाढीनुसार आरोग्य सुविधा अपुऱ्या ठरत आहेत, सरकारी दवाखान्यात ,सुविधा वाढायला पाहिजे जेणेकरून अलिबाग पनवेल येथे उपचारासाठी जावे लागणार नाही. सांस्कृतिक वारसा असणारे शहर यासाठी प्रशासनाने नाट्यगृह नव्याने तयार करायला पाहिजे. उद्याने यांची दीर्घकालीन देखभाल करून जास्त आकर्षक,प्रेक्षणीय करावी,म्हणजे शहराचा नावलौकिक वाढेल.

समस्या वाढणारच त्यावर दीर्घकालीन उपाययोजना केली पाहिजे.वाहतूक व्यवस्था,सिग्नल उपाय केला पाहिजे.

बाप्पाचे शहर अशी ओळख असणारे शहर यासाठी समस्त नागरिकांच्या सूचना,या साठीच्या उपाययोजना यांच्या समन्वयातून शहराचा विकास होईल याकडे प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे..

चौक,तलाव,सुशोभिकरण होत असताना मुख्य रस्त्याच्या तुतर्फा असणाऱ्या हातगाड्या,अतिक्रमण काढले पाहिजे .पेण चे विकासात्मक आराखडा हाच सर्वांचा ध्यास. त्यामुळे पेण शहराची वाढती लोकसंख्या आणि अपुऱ्या पडत असलेल्या नागरी सुविधा याकडेही वेळीच लक्ष दिले पाहिजे असेही मत सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केले.

## भिवंडीत काँग्रेसला धक्का... पक्षाच्या जेष्ठ नेत्याने केला समाजवादी पक्षात प्रवेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : गत महापालिकेच्या महापौर निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे 18 नगरसेवकांनी पक्ष विरोधी काम केल्याने पक्षाने त्यांची हकालपट्टी करून नगरसेवक पद रद्द केले त्यानंतर भिवंडी शहरात काँग्रेस पक्षात सुरू असलेली गटबाजी पुन्हा एकदा उफाळून आली असुन भिवंडी महापालिका निवडणुकीची तयारी पक्षाच्या माध्यमातून सुरू असतानाच पक्षाचे ज्येष्ठ नेते अनस अन्सारी यांनी अचानकपणे समाजवादी पक्षात प्रवेश केल्याने पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्तेना जोरदार धक्का बसला आहे.काँग्रेस पक्ष व स्थानिक राजकारणात ते एक प्रभावशाली व्यक्ती म्हणून अन्सारी यांची ओळख आहे.अनस अन्सारी यांचा हा पक्ष प्रवेश समाजवादी पक्षाचे आमदार तथा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अबू असीम आझमी यांच्या उपस्थितीत झाला.यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी स्वतः त्यांना पक्षाचे सदसत्व दिले. यावेळीपक्षाचे माजी अध्यक्ष अराफत शेख, इतर पदाधिकारी उपस्थित होते.अनस अन्सारी गेल्या २५ वर्षांपासून राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सक्रिय आहेत,काँग्रेसपक्षाने त्यांना काम करण्याची संधी देत नसल्याने व पक्षातील अंतर्गत गटबाजी बाबतीत कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने निराश होऊन त्यांनी अखेर समाजवादी पक्षात सामील होण्याचा निर्णय घेतल्याने भिवंडीमध्ये समाजवादी पक्षाला नवीन बळकटी मिळेल. पक्ष लवकरच त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवू शकतो अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

## जुन्नर : विनापरवाना वाढदिवस मिरवणुकीत अपघात

### युवकाचा मृत्यू आणि सहा जण जखमी - नियम न पाळल्याने नागरिकांमध्ये संताप



### देवराम लांडे यांसह एका आरोपीस अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : स्वतःच्या वाढदिवसानिमित्त पोलिसांची परवानगी न घेता काढण्यात आलेल्या मिरवणुकीत भीषण अपघात घडला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात झालेल्या या दुर्घटनेत आदित्य सुरेश काळे (वय २१, रा. खामगाव) या युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी झाले.

ही घटना बुधवार, ९ सप्टेंबर रोजी दुपारी सव्वादोनच्या सुमारास घडली. जुन्नर शहरातील लांडे यांच्या निवासस्थानातून मिरवणूक सुरू झाली होती. सोमतवाडी येथील शिव छत्रपती तरुण मंडळ आणि खामगाव-शिवेचीवाडी येथील मुक्तादेवी तरुण मंडळ या दोन झांज पथकांचा यात सहभाग होता. मिरवणुकीतील मोठ्या आकाराच्या डी.जे. वाहनाचा चालकाचा ताबा सुटून गाडीचा ब्रेक फेल झाल्याने ती सुरक्षा रक्षकाच्या केबिनला धडकली. गर्दीच्या रस्त्यावर पुढे मोठा अनर्थ टळला, परंतु आदित्य काळे याचा जागीच मृत्यू झाला.

जखमींमध्ये गोविंद शंकर काळे (वय ३३), विजय हिरामण केदारी (वय २४), सागर सुनील केदारी (वय २६), बाळू किसन काळे (वय २९), सचिन गणपत केदारी (वय ३२) – हे सर्व शिवेचीवाडी येथील, आणि किशोर रामचंद्र घोगरे (वय ३५, रा. सोमतवाडी) यांचा समावेश आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे व पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी दिलेल्या माहितीनुसार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष देवराम सखाराम लांडे, त्यांचा मुलगा अमोल लांडे, डी.जे. सिस्टीम मालक सौरभ वाल्मीक शेखरे आणि चालक नामदेव विठ्ठल रोकडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादिदार धोंडू भिका काळे यांनी तक्रारीत नमूद केले की, कोणतीही परवानगी न घेता मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. कर्कश आवाजात गाणी वाजवत लोकांची गर्दी असलेल्या मार्गावर बेदरकारपणे गाडी चालवून अपघात घडवण्यात आला.

अपघातानंतर शिवेचीवाडी व सोमतवाडीतील ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यासमोर आंदोलन केले. "डी.जे. बंदी असतानाही तो वापरण्यात आला, त्यामुळे ही दुर्घटना झाली," असा आरोप करत आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. मृतदेह ताब्यात घेण्यासही ग्रामस्थांनी नकार दिला.

उशिरा रात्री पोलिसांनी देवराम लांडे यांसह एका आरोपीस अटक केली असून तपास सुरू आहे. प्रशासनाने अशा अनधिकृत मिरवणुका रोखण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतली आहे. नागरिकांनीही सार्वजनिक सुरक्षेला बाधा आणणाऱ्या अशा प्रकारांना आळा घालण्याची मागणी केली आहे. ही घटना एक इशारा ठरावी, असे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे. नियमांचे पालन करूनच उत्सव साजरे करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

## बालकांच्या काळजीसाठी जिल्हास्तरीय समिती सदस्यतेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 च्या कलम 54 नुसार तसेच महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.बालगृ-2017/ प्र.क्र.211 का-8, दि.21 मार्च, 2018 अन्वये महिला व बाल विकास विभागांतर्गत या बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थांची नियमित तपासणी करण्यासाठी जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर गठीत समितीतील खालील प्रमाणे सदस्यांचे नामांकन मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक व पात्र व्यक्ती यांनी ही जाहीरात प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून 07 दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रासह नामांकन प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा, असे ठाणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नमिता शिंदे यांनी कळविले आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, नियोजन भवन, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, कोर्ट नाका, ठाणे (पश्चिम) 400601 येथे संपर्क करावा.

1. बाल हक्क, संरक्षण व कल्याण या क्षेत्रात कार्यरत असलेल्या नागरी समूहाचा एक सदस्य.
2. बालकांसोबत काम करण्याचा अनुभव असलेला एक मानसोपचार तज्ञ.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ■ नवी मुंबई ■ ठाणे ■ पालघर ■ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

## वाडा मनोर महामार्ग खड्ड्यात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



वाडा : मनोर-वाडा-भिवंडी या महामार्गाच्या दुर्दशेबद्दल विधानसभेपासून अधिवेशनापर्यंत मुद्दा गाजलेला असूनही रस्त्याची अवस्था आजही बिकट आहे. वाडा-मनोर मार्गावर गुडघाभर खड्डे पडले असून यातून वाट काढताना वाहनचालकांना नाकीनऊ येत आहे. जीवघेण्या खड्ड्याची पाहणी करून सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी केली जात आहे. वाडा ते भिवंडी महामार्गाची झालेली दुरावस्था काही केल्या सुधारायला तयार नसून जनतेला सतावणाऱ्या या समस्येची प्रशासन दखल घेणार आहे की, नाही असा सवाल विचारला जात आहे. भिवंडीकडे जाणे म्हणजे साक्षात नरकाचा प्रवास असल्याचा लोकांचा अनुभव असून मनोर ते वाडा या महामार्गाची दिवसेंदिवस अवस्था बिकट होऊ लागली आहे. वरले, सापने, पाली, कंचाड, वाघोटे, अंभई, आमगाव, यासह करळगांव अशा सर्वच रस्त्याला खडडयांची चादर पसरलेली आहे. वाघोटे टोलनाक्याच्या पुढे महामार्गावर गुडघाभर खड्डे पडले असून देशातील कुठल्याही महामार्गाची इतकी भीषण अवस्था नसेल, अशी परिस्थिती आहे. वाहनांना खडडयातून वाट काढणे जिकिरीचे झाले असून खडडयांसह आता वाहतूककोंडीचा देखील सामना करावा लागत आहे. पावसाने उघड दिल्याने काही ठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू असले तरी कुचकामी दुरुस्ती करून काही उपयोग नाही. ठोस उपाययोजना करा, अशी मागणी केली जात आहे.

### वाडा ते मस्ताननाका दरम्यान वाहन चालकांची होतेय कंबरमोड

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024